पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

# मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड, पुणे ३८

वाणिज्य विभाग

## वार्षिक अहवाल २०१७-१८

मामासाहेब मोहोळ महाविद्यालयांमध्ये मा.शरदचंद्रजीपवार साहेबयांच्या वाढदिवसानिमित्त दि. ०४ डिसें. ते दि.०९ डिसें. २०१७ याकालावधी मध्ये वाणिज्य विभागाच्या वतीने मा.प्राचार्य डॉ.सुषमा भोसले व उपप्राचार्य डॉ.एम.आर. अवघडे, विभाग प्रमुख डॉ. टी. डी. गुंजाळ, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.प्रकाश हुंबाड ,सहकारी प्रा. डॉ.रूपाली शेंडकर , प्रा. स्वाती शिंदे, प्रा.अशोक शेळके, प्रा.जे.एम.जोशी, प्रा.टी.डी.जाधव प्रा.पूजा गायकवाड यांच्या सहभागातून 'मॅनेजमेंट वीक ' साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे विद्यार्थ्यांनी पूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी स्वीकारून कार्यक्रमाचे व्यवस्थापन उत्कृष्ट पद्धतीने केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन जेष्ठ व्यवस्थापन तज्ञ डॉ. पी. सी. शेजवलकर यांच्या हस्ते करण्यात आले.त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाची कार्ये कोणती हे सांगून तेदैनंदिन जीवनात किती महत्त्वाचे आहे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.संजयकप्तानयांनीवैयक्तिकव्यस्थापनाचेविविधपैलूसांगितले.बी.एम.सी.सी चेप्राचार्यसी.एन.रावळसरांनीविध्यार्थ्यांनाबदलाचेव्यवस्थापनयाचेबहुमूल्यमार्गदर्शनविविधउदहरणांच्यामाध्यमातूनकेले. एस.पी.महाविद्यालयाच्या

उपप्राचार्य डॉ.सरोज हिरेमठ यांनी विद्यार्थ्यांना cv, Resume, bio-data यातील महत्वाचा फरक कोणता तसेच ब्लॉग यावर उत्कृष्ट मार्गदर्शन केले. सेंट व्हिन्सेंट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल आडसुळे यांनी वेळेचे व्यवस्थापन कसे करावे यावर मार्गदर्शन करून जीवनातील त्याचे महत्व पटवून दिले. बी.एम.सी.सी.चे डॉ.पी.व्ही.साठे यांनी विपणनातील आधुनिक प्रवाह यावर अतिशय सुंदर उदाहरणांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉं. पी.सी.शेजवलकर यांनी पाया रचून केली तर सांगता पी.व्ही. साठे यांनी सोनेरी कळस चढविला.

ICA आणि वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कॉमर्स चॅम्पियन शिप ऑनलाइन स्पर्धा परीक्षा घेण्यात आली त्यामधील विजेता विद्यार्थी महादेव माळवदकर यास रुपये दोन हजार चे पारितोषिक मिळाले.

दि.11व12 डिसें. रोजी सामाजीक विषयावरील जाणीव जागृती अंतर्गत रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली ज्या मध्ये सेल्फीचे वेड, प्रदूषण समस्या, सेव्ह वॉटर, सेव्ह गर्ल्स, सेव्ह ट्री, सैनिक मानवंदना, रस्ता सुरक्षा, शेतकरी आत्महत्या याविषयावर रांगोळया काढण्यात आल्या, तसेच विद्यार्थ्यांना व्यवसायाचा अनुभव मिळवा म्हणून मार्केटिंग फेअर आयोजित करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध वस्तू आणि खाद्य पदार्थांची विक्री करून व्यवसायाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

रांगोळी स्पर्धेचे परीक्षण प्रा.अपेक्षा जाधव यांनी केले. त्याच बरोबर पर्यावरण जाणीव जागृतीसाठी विज्ञान प्रदर्शन आयोजित केले ज्यामध्ये

विद्यार्थ्यांनी रेनवॉटर हार्वेस्टिंग, स्मार्ट सिटी, स्मार्ट पुणे, अन्न भेसळ, पाण्याचा गैरवापर, पाणी प्रदूषण, वायु प्रदूषण, गांडूळ खत प्रकल्प, सेंद्रिय खताचा वापर या विषयांचा समावेश होता, कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे खजिनदार मा.श्यामराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे मानद सचिव संदीपजी कदमसाहेब व प्रशासकीय सहसचिव ए.एम जाधवसाहेबांनी महाविद्याल यास भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. कार्यक्रमा साठी महाविद्यालयातील प्राध्यापक आवर्जून उपस्थित होते.